ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)

Volume-X, Issues-IV July - August 2021

# इयत्ता आठवीच्या मातृभाषा मराठीच्या पाठयपुस्तकातील आशय घटकांचा विद्यार्थ्यांमध्ये जीवन कौशल्य विकासाच्या दृष्टिकोनातून चिकित्सक अभ्यास

डॉ. वैशाली पुंजाराम सूर्यवंशी

*प्राचार्य,*

*मातोश्री शिक्षणशास्त्र महाविद्यालय, एकलहरे, नाशिक*

**प्रस्तावना –**

21 व्या शतकात विज्ञान तंत्रज्ञानाचे महत्व अनन्यसाधारण आहे. आजचे विद्यार्थी विज्ञान तंत्राने विकसित होत आहेत. परंतु भारत देश हा विविधतेतून एकता असलेला देश आहे. आपली भारतीय संस्कृती ही एक महान संस्कृती आहे आणि हया महान संस्कृतीचा वारसा हा एका पिढीकडून दूस–या पिढीकडे आपण सूपूर्त करत असतो. त्यासाठी आपली भावी पिढी ही संस्कारक्षम व्हावी हया दृष्टीने शालेय जीवनापासून प्रयत्न करणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांना आपले जीवन जास्तीत जास्त कार्यक्षमतेने व यशस्वीपणे जगता यावे यासाठी विद्यार्थ्यांमध्ये कौशल्ये, संस्कर व प्रयत्नांची जोड आवश्यक आहे म्हणजेच – विद्यार्थ्यांनी अंगभूत कौशल्ये विकसित करण्याचा सातत्यपूर्ण व सुसंगत प्रयत्न करणे म्हणजेच जीवन कौशल्ये शिक्षण होय. जीवन यशस्वीपणे जगण्यासाठी व्यक्तीच्या अंगी ही जीवन कौशल्ये असणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांना दैनंदिन अध्यापनातून शिक्षकाने अगदी नकळतपणे विद्यार्थ्यांपर्यंत ही जीवन कौशल्ये पोहचविणे आवश्यक आहे. कारण ही कौशल्ये विद्यार्थी जेव्हा सहज शिकतील, त्यांचा जीवनात प्रत्यक्ष वापर करतील हेच जीवन कौशल्य शिक्षणाचे ध्येय आहे.

वैदिक काळात विद्यार्थ्यांला जीवन कौशल्याचे धडे हे गरुगृही मिळत. परंतु आजच्या युगात जीवन कौशल्याचे धडे हे शालेय शिक्षणातूनच विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचतील.

cc BY

Aarhat Publication & Aarhat Journalsis licensed Based on a work athttp://www.aarhat.com/eiirj/

**संशोधनाची गरज –**

आजुबाजूच्या वातावरणातील ताण–तणाव, हिंसाचार, जातीयता, सामाजिक पदे पाहता विद्यार्थ्यांना जीवन सहज सुंदर जगता यावे यासाठी जीवन कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये पाठयपुस्तकातून, अध्यापनातून रुजणे आवश्यक आहे. जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) पुढीलप्रमाणे दहा जीवन कौशल्ये पुरस्कृत केली आहेत. त्यात स्वजागृती, सहानुभूती समस्या निराकरण, निर्णय घेणे, प्रभावी संप्रेषण, चिकित्सक विचार प्रक्रिया, सर्जनशील, विचार प्रक्रिया, आंतर व्यक्ती संबंध, भावनांचे समायोजन व ताण तणावांचे समायोजन यांचा समावेश आहे.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास जर साधावयाचा असेल तर जीवन कौशल्यांची जोड आवश्यक असते. किशोरवयीन वयोगटातील विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक, भावनिक, सामाजिक बदल घडवायचे असतील तर त्यांना योग्य ते मार्गदर्शन करणे आवश्यक असते.

**संशोधनाचे महत्व –**

वैदिक काळातील गुरुगृही जावून शिक्षण घेणारा विद्यार्थी व आजच्या युगातला शाळेत जाणारा विद्यार्थी यात फार फरक आहे. पूर्वीचा विद्यार्थी गृरु आज्ञेला प्रमाण मानणारा होता. प्रामाणिक व अभ्यासू होता पण आजचा विद्यार्थी पाहता विद्यार्थ्यांमध्ये गुन्हेगारी, हिंसाचार, आत्महत्या हे प्रमाण फार वाढले आहे. हे जर आपल्याला कमी करावयाचे असेल तर संस्कारक्षम पिढी घडविणे आवश्यक आहे. आणि अशी संस्कारक्षम पिढी घडवायची असेल तर त्यासाठी दैनंदिन अध्यापनातून शिक्षकांना जीवन कौशल्ये पाठयपुस्तकातल्या आशयातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. मातृभाषा मराठी विषयाचे अध्यापन करतांना त्यातील कोणते घटक, कोणते आशय हे जीवन कौशल्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी आवश्यक आहे याचा शोध प्रस्तुत संशोधनातून घेतला आहे.

**समस्या विधान –**

इयत्ता आठवीच्या मातृभाषा मराठीच्या पाठयपुस्तकातील आशय घटकांचा विद्यार्थ्यांमध्ये जीवन कौशल्य विकासाच्या दृष्टिकोनातून चिकित्सक अभ्यास.

**पारिभाषिक शब्दांचा व्याख्या –**

1. मातृभाषा मराठी – मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी प्रथम भाषा मराठी जी महाराष्ट्राची मातृभाषा आहे.
2. विद्यार्थी – इ. 8 वीचे मातृभाषा मराठीचे अध्ययन करणारे सर्व विद्यार्थी.
3. जीवन कौशल्य – विद्यार्थ्यांमधील अंगभूत कौशल्ये विकसित करण्याचा सातत्यपूर्ण व सुसंगत प्रयत्न म्हणजे जीवन कौशल्य शिक्षण होय.
4. पाठयपुस्तक – महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाने प्रकाशित केलेले पुस्तक.

**संशोधनाची उदिदष्टे –**

1. इयत्ता 8 वीच्या मातृभाषा मराठीच्या पाठयपुस्तकातील जीवन कौशल्यांचा शोध घेणे.
2. इयत्ता 8 वीच्या मातृभाषा मराठीच्या पाठयपुस्तकातील प्रत्येक घटकामध्ये आढळणा–या जीवन कौशल्याची प्रमाणानुसार तुलना करणे.
3. इयत्ता 8 वीच्या मातृभाषा मराठीच्या पाठयपुस्तकातील एकूण घटकांमध्ये जीवन कौशल्याचा प्रत्येक कौशल्याला अनुसरुण तुलना करणे.

**संशोधनाची गृहीतके –**

1. इयत्ता 8 वीच्या मातृभाषा मराठीच्या पाठयपुस्तकात जीवन कौशल्याला अनुसरुन महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाने प्रकाशित केलेले आहे.
2. मातृभाषा मराठीच्या इयत्ता 8 वीच्या पाठयपुस्तकातील प्रत्येक आशयात जीवन कौशल्य शिक्षणाचा समावेश केलेला आहे.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा –**

1. प्रस्तुत संशोधन हे इयत्ता 8 वीच्या मातृभाषा मराठीच्या विषयापुरतेच मर्यादीत आहे.
2. प्रस्तुत संशोधन इयत्ता 8 वीच्या मातृभाषा मराठीच्या पाठयपुस्तकातील आशयातून जीवन कौशल्यांचा विकास यापुरतेच मर्यादीत आहे.

**संशोधनाची कार्यपध्द्ती –**

प्रस्तु संशोधन हे इयत्ता 8 वीच्या मातृभाषा मराठीच्या सध्याच्या प्रचलित पाठयपुस्तकांवर आधारित असल्यामुळे वर्तमान स्थितीचा शोध करण्यासाठी सर्वेक्षण पध्दती व आशय विश्लेषण तंत्राचा वापर केलेला आहे.

**निष्कर्ष –**

1. इयत्ता 8 वीच्या मातृभाषा मराठीच्या पाठयपुस्तकातील आशय विद्यार्थ्यांमध्ये जीवन कौशल्यांच्या विकासासाठी उपयुक्त आहे.
2. स्वतःच्या क्षमता, मर्यादा, आवडी–निवडी ओळखण्याचे कौशल्य, आंतर व्यक्ती संबंध या जीवन कौशल्यांचा 3 घटकांमध्ये समावेश करण्यात आलेला आहे.
3. सहानुभूती या जीवन कौशल्याचा चार घटकात समावेश करण्यात आला आहे.
4. सर्जनशील विचार प्रक्रिया हे जीवन कौशल्य हे 4 घटकांमध्ये आढळून येते.
5. ताण तणावाची कारणे व्यवस्थापन करण्याचे कौशल्य हे जास्तीत जास्त घटकांमध्ये दिसून येते.
6. चिकित्सक विचार प्रक्रिया हे जीवन कौशल्य ही जास्तीत जास्त घटकामध्ये आढळून येते.
7. आपल्या व इतरांच्या भावना, तसेच त्यांचे परिणाम ओळखून त्यावर नियंत्रण ठेवण्याचे कौशल्य, भावनांचे समायोजन या जीवन कौशल्यांचा अल्प प्रमाणात समावेश होतो.

**संदर्भ –**

मुळे व उमाठे, (1998). शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे